**सहकारी संस्थांची कलम ८९ अ अन्वये**
**निबंधक व खात्यातील लेखापरीक्षक यांनी**
**तपासणी करणेबाबत..**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे. यांचे कार्यालय**
जा.क्र. प्रशासन/परिपत्रक/क-८९ (अ) तपासणी/१९६/२०१५
दिनांक : २५/०६/२०१५

## -: परिपत्रक :-

**संदर्भ** :१) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.आस्था/ए-३/तपासणी/सोसा/१९८२/दिनांक ०२.०२.१९८२
२) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.संवका/डी-१/तपासणी/मार्गदर्शक सूचना/१९९८, दिनांक १५/०९/१९९८
३) या कार्यालयाने राबविलेली माहिती व्यवस्थापन प्रणाली (M.I.S.) निर्देश क्र. स.आ./ संवका/एमआयएस/२००२,(केवळ तपासणी संबंधी निर्देशापुरते) दिनांक ०८/०१/२००२.

संदर्भाधिन परिपत्रकीय निर्देशान्वये संस्थांच्या तपासण्या घेणेबाबत कार्यक्षेत्रनिहाय संबंधित निबंधकांना लक्षांक निर्धारित करून देण्यात आले होते. तथापि कर्मचारी संख्या अपुरी असणे तसेच इतर नियमीत कामकाजाची वाढीव व्याप्ती इ. कारणांने गेल्या काही वर्षापासून कलम ८९ अ अन्वये सहकारी संस्थांची पुरेशा प्रमाणात तपासणी होत नाही असे निदर्शनास आले आहे. या परिपत्रकान्वये तपासणी संबंधी पूर्वीचे परिपत्रकीय निर्देश रद्द करून प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या परिपत्रकान्वये निर्धारित लक्षांकाप्रमाणे तपासण्या करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मध्ये नुकत्याच झालेल्या बदलामुळे लेखापरीक्षणाचे कामकाजासाठी स्वायत्तता प्रदान झाल्याने खात्याबाहेरील लेखापरीक्षकांच्या नियुक्तीचा अधिकार संस्थांना प्राप्त झाला आहे. यामुळे लेखापरीक्षण विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवाही काही प्रमाणात या वैधानिक तपासणी कामकाजासाठी उपलब्ध होत आहेत. या उपलब्ध मनुष्यबळाचा वापर कलम ८९ अ अन्वये सहकारी संस्थांच्या तपासणीसाठी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे निबंधकानेदेखील नियमीत कामकाज सांभाळून तपासण्या करणे अभिप्रेत आहे.

संस्थेची आर्थिक व सांपत्तीक स्थिती निदर्शनास येणेसाठी, संस्थेच्या कामकाजामधील अनियमीतता व गंभीर बाबी वेळीच निष्पन्न होणेसाठी, संस्थेस निर्धारित केलेली विवरणे नियमीतपणे सादर होणे व संस्था कायदा व पोटनियमाप्रमाणे कामकाज पार पाडत असल्याचे अधोरेखित होणेसाठी, संस्थांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होवून प्रभावी नियंत्रण राखण्यासाठी सहकारी संस्थांची तपासणी करणे अत्यावश्यक आहे.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये सहकारी संस्थांच्या कामकाजाची तपासणी करण्याचे अधिकार निबंधकास आहेत. सदर कलमानुसार संस्थांची पुढील मुद्यांवर तपासणी करण्याची कायदेशीर तरतूद आहे.**

अ] अधिनियम, नियम आणि संस्थेचे उपविधी यांच्या तरतूदीचे संस्था योग्य रीतीने अनुपालन करीत आहे;

ब] अभिलेख आणि लेखापुस्तके योग्य नमुन्यात ठेवलेली आहेत;

क] संस्थेचा कारभार सुयोग्य व्यापारी तत्वानुसार आणि व्यावसायिक व कार्यक्षम व्यवस्थापनाखाली चालवला जात असल्याची सुनिश्चिती करणे.

ड] संस्था सहकारी तत्वाचे आणि या अधिनियमांच्या तरतूदी आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांनुसार राज्य शासनाने दिलेल्या निर्देशक तत्वांचे आणि निर्देशांचे अनुपालन करीत आहे कां याची खात्री करणे.

इ] कलम ७९ अन्वये तरतूद केलेली विवरणे निबंधकाला नियमितपणे व योग्यरितीने सादर झाली असल्याची शहानिशाः करणे;

उपरोक्त तरतुदींचा वापर करुन संबंधित निबंधकाने आणि लेखापरीक्षकांनी या परिपत्रकाव्दारे निर्धारित केलेल्या स्तरनिहाय लक्षांकानुसार सहकारी संस्थांची तपासणी करणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेवून पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

## विभाग अ

### निबंधकांनी कलम ८९ अ अन्वये करावयाची तपासणी:

**राज्यस्तर:**

१. राज्यातील शिखर संस्थांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येईल.
२. राज्य पातळीवरील व राज्यातील विविध प्रकारामधील महत्वपूर्ण संस्थांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येईल.
३. अशा रितीने वर्षात एकूण २४ सहकारी संस्थांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालयामार्फत करण्यात येईल.

**राज्यस्तरावरील संस्थाप्रकार निहाय सहकार आयुक्त कार्यालयाचा तपासणी लक्षांक संक्षिप्तरित्या खालीलप्रमाणे:**

| अ.क्र. | संस्था प्रकार | लक्षांक |
|---|---|---|
| १ | शिखर संस्था | ६ |
| २ | राज्यस्तरीय संस्था | |
| | अ) मोठी उलाढाल असणाऱ्या नागरी सहकारी बँका | ३ |
| | ब) मोठी उलाढाल असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्था व ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था | ५ |
| ३ | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | २ |
| ४ | जिल्हा फेडरल सहकारी संस्था | २ |
| ५ | शासन अर्थसहाय्य प्राप्त सहकारी संस्था | २ |
| ६ | मोठी उलाढाल असणाऱ्या विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था | २ |
| ७ | अन्य विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी निवडक संस्था | २ |

**विभाग, जिल्हा व तालुकास्तर**

कलम ८९ अ अन्वये विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय निबंधकांनी करावयाच्या तपासणीचा, वार्षिक तपासणी कार्यक्रम तयार करताना पुढीलप्रमाणे नमूद महत्वाच्या संस्थांचा समावेश करावा.

१. जिल्हा मध्यवर्ती बँक

२. नागरी सहकारी बँक

३. नागरी/ग्रामीण बिगरशेती/ पगारदार पतसंस्था

४. जिल्हा फेडरल संस्था

५. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

६. औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहती

७. वाहतूक सहकारी संस्था

८. ५० पेक्षा अधिक सभासद असणाऱ्या गृहनिर्माण सहकारी संस्था

९. शासन अर्थसाह्य प्राप्त सहकारी संस्था

१०. अन्य विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी निवडक संस्था

**तपासणी अधिकारी व कर्मचा-यांचा पदनिहाय लक्षांक संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे :**

| अ.क्र. | तपासणी घेणा-या अधिका-याचे पदनाम | पदनिहाय प्रत्येकी वार्षिक तपासणी लक्षांक |
|---|---|---|
| १ | विभागीय सहनिबंधक | २४ |
| २ | जिल्हा उपनिबंधक, उपनिबंधक शहर व वॉर्ड प्रत्येकी | २४ |
| ३ | सहाय्यक निबंधक व सहाय्यक निबंधक वॉर्ड प्रत्येकी | २४ |
| ४ | सहकार अधिकारी, श्रेणी १ , २ व सहाय्यक सहकार अधिकारी प्रत्येकी | १२ |

## विभाग ब

**खात्यातील लेखापरीक्षकांनी कलम ८९ अ अन्वये करावयाची तपासणी:**

कलम ८९अ अन्वये खात्यातील लेखापरीक्षकांचा वार्षिक तपासणी कार्यक्रम तयार करताना तपासणी कार्यक्रमामध्ये पुढीलप्रमाणे नमूद महत्वाच्या संस्थांचा समावेश करावा.

१. जिल्हा मध्यवर्ती बँक

२. नागरी सहकारी बँक

३. नागरी/ग्रामीण बिगरशेती/ पगारदार पतसंस्था

४. जिल्हा फेडरल संस्था

५. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था

६. औद्योगिक सहकारी संस्था व औद्योगिक सहकारी वसाहती

७. वाहतूक सहकारी संस्था

८. ५० पेक्षा अधिक सभासद असणाऱ्या गृहनिर्माण सहकारी संस्था

९. शासन अर्थसाह्य प्राप्त सहकारी संस्था

१०. अन्य विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी निवडक संस्था

**लेखापरीक्षण विभागातील तपासणी अधिकारी व कर्मचा-यांचा पदनिहाय लक्षांक संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे :**

| अ.क्र | तपासणी घेणा-या अधिका-याचे पदनाम | पदनिहाय प्रत्येकी वार्षिक तपासणी लक्षांक |
|---|---|---|
| १ | विभागीय सहनिबंधक व सहनिबंधक (लेखापरीक्षण) | २४ |
| २ | जिल्हा विशेष लेखापरीक्षक, विशेष लेखापरीक्षक, वर्ग १ प्रत्येकी | २४ |
| ३ | विशेष लेखापरीक्षक, वर्ग २ प्रत्येकी | २४ |
| ४ | तालुका लेखापरीक्षक श्रेणी -१,२ व उपलेखापरीक्षक प्रत्येकी | २४ |

**वार्षीक तपासण्यांचा कृती आराखडा तयार करणेसंबंधी सूचना:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अ अन्वये सहकारी संस्थांच्या कामकाजाचे निरीक्षण तथा तपासणी करण्याचे अधिकार निबंधकास आहेत. सदर कलमानुसार प्रशासन व लेखापरीक्षण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी कलम ८९ अ अन्वये करावयाच्या तपासणीबाबतचा कृती आराखडा करतांना खालील कृती निर्देश विचारात घ्यावेत.

१. राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय संस्थांचा कलम ८९अ अन्वये वार्षिक तपासणी कार्यक्रम संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी तयार करावा. सदरहू प्रस्तावित तपासणी कार्यक्रमातील संस्थांचे तपासणी आदेश कार्यक्षेत्रनिहाय संबंधित निबंधकाकडून पारित करावेत.

२. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्ह्यामध्ये सदरहू संस्था वार्षिक तपासणी कार्यक्रमात तपासणीसाठी प्रस्तावित करण्यात याव्यात.

३. निश्चित केलेल्या संस्थांच्या तपासणीसाठी आदेशाने तपासणी पथक गठीत करतांना तपासणी पथक प्रमुखाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा शक्यतो समावेश करण्यात यावा.

**अ)** ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार मोठे आहेत (उदा.महाराष्ट्र राज्य सह.बँक, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, नागरी सह.बँका व मोठया पतसंस्था इ.) अशा संस्थांसाठी तपासणी पथक गठीत करण्यात यावे व सर्व साधारणत: कार्यालय प्रमुख तथा गट अ व ब स्तरातील अधिकारी हे तपासणी पथक प्रमुख म्हणून नेमण्यात यावेत.

**ब)** तपासणी पथकामध्ये संबंधित निबंधकांच्या तसेच लेखापरीक्षकांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचा उपलब्धतेनुसार व आर्थिक व्यवहारानुरुप आवश्यक त्या प्रमाणात समावेश करावा.

**क)** ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार तुलनात्मकरित्या कमी आहे. अशा मध्यम व छोट्या संस्थांसाठी तपासणी अधिकाऱ्याची व्यक्तीगतरित्या नेमणूक करावयाची आहे. सदरहू तपासणीसाने संबंधित संस्थेची तपासणी स्वत: पूर्ण करावयाची आहे.

ड) कोणत्या संस्थांसाठी पथक गठीत करावयाचे, कोणत्या संस्थांसाठी पथक गठीत न करता तपासणीसाची नेमणूक करावयाची आहे याचे तारतम्य निबंधकाने ठेवावे.

४. संस्था तपासणी कालावधी हा संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार,उलाढाल व कार्यक्षेत्र या अनुसार कामकाजाची व्याप्ती विचारात घेऊन २ ते ५ दिवसापेक्षा अधिक राहणार नाही असा निश्चित करण्यात यावा.

५. सदरहू महत्वपूर्ण संस्थांचा तपासणी कार्यक्रम तयार करतांना संस्थास्तर, भागभांडवल व सभासद संख्या विचारात घेवून तपासणीची वारंवारीता खालील नमूद निर्देश विचारात घेवून ठरवावी.

अ) राज्यस्तरीय व विभागस्तरीय संस्थांची तपासणी प्रतिवर्षी पूर्ण होईल असे धोरण निश्चित करावे.

ब) रूपये १ लाखांचे वरील भागभांडवल असणाऱ्या सहकारी संस्थांची तपासणी दोन वर्षातून किमान एकदा पूर्ण होईल असे धोरण राबवावे.

क) ५० पेक्षा कमी सभासद असणाऱ्या गृहनिर्माण संस्था, रू. १ लाखाचे आतील भागभांडवल असणाऱ्या महत्वपूर्ण सहकारी संस्था, अन्य विविध प्रकारच्या सहकारी संस्थांपैकी निवडक सहकारी संस्था इ. संस्थांची तपासणी तीन वर्षातून किमान एकदा पूर्ण होईल असे पहावे.

६. राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर तपासणी कार्यक्रमामध्ये तपासणीसाठी संस्था समाविष्ट करतांना स्तरनिहाय संस्थांची द्विरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. वार्षिक तपासणी कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांचे संबंधित निबंधक कार्यालयास प्राप्त असलेले तक्रार अर्ज संबंधित तपासणी अधिका-यास हस्तांतरीत करावे व तपासणी अधिका-याने तपासणी करताना सदरहू तक्रार अर्जाची चौकशी करुन निष्पन्न निरीक्षणे या तपासणी अहवालामध्ये नोंदवावीत. त्याचप्रमाणे तक्रारीच्या मुद्यांचा स्वतंत्र अहवाल देखील निबंधकांकडे सादर करावा. तक्रार अर्ज प्राप्त असणा-या संस्थांची तपासणी प्राधान्याने करण्यात यावी.

८. वार्षिक तपासणी कार्यक्रमामध्ये राज्य व विभाग स्तरावरील संस्थांच्या समावेशाची निश्चिती दरवर्षी माहे जानेवारी मध्ये पूर्ण करण्यात यावी. त्याच प्रमाणे जिल्हा व तालुका स्तरावरील संस्थांच्या समावेशाची निश्चिती दरवर्षी माहे फेब्रुवारी मध्ये पूर्ण करण्यात यावी. अशा रितीने निबंधक निहाय राज्याचा वार्षिक तपासणी आराखडा एकत्रीतरित्या दरवर्षी १५ मार्च पर्यत तयार करून वरिष्ठांकडे सादर करावा. या वार्षिक आराखड्याप्रमाणे तपासणी कार्यक्रमाची अंमलबजावणी दरवर्षी १ एप्रील पासून करण्यात यावी.

९. एप्रीलपासूनच दरमहिन्याचा लक्षांक ज्या-त्या महिन्यामध्ये पूर्ण होईल अशा रितीने संबंधित तपासणी पथक प्रमूख व तपासणी अधिकारी यांनी सहकारी संस्थांच्या तपासण्या करावयाच्या आहेत. एप्रील व मे मध्ये संस्थांचे आर्थीक लेखे व पत्रके अंतिम झाली नसतील तर मागील वर्षाच्या आर्थीक पत्रकांचा संदर्भ घेवून उपलब्ध लेख्यातील नोंदीप्रमाणे तपासणी पूर्ण करावी.

**सर्वसाधारण सूचना:-**

१. तपासणीचा वार्षिक लक्षांक २४ असल्यास दरमहा २ संस्थांची तपासणी करावी आणि तपासणीचा वार्षिक लक्षांक १२ असल्यास दरमहा १ संस्थेची तपासणी करावी.

२. तपासणी करावयाच्या संस्थांसाठी अधिकारी, कर्मचारी यांच्या नेमणुका करताना संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार, उलाढाल व, कार्यक्षेत्र याचा विचार करुन पदानुरुप नेमणूक केली जाईल असे पहावे.

३. तपासणी पथक प्रमुख तथा तपासणी अधिकाऱ्याने तपासणीअंती निदर्शनास आलेल्या महत्वाच्या मुद्यांबाबत शेवटच्या दिवशी संस्थेचे संचालक मंडळ अथवा संस्थेचे अध्यक्ष किंवा कार्यकारी संचालक यांचेशी चर्चा करावी त्यानंतर तपासणी अहवाल अंतिम करावा.

४. वार्षिक तपासणी कार्यक्रमाप्रमाणे संस्थेची प्रत्यक्ष तपासणी पूर्ण झालेनंतर तपासणी अधिकाऱ्याने तथा तपासणी पथक प्रमूखाने ८ दिवसांचे आत तपासणी अहवाल संबंधित निबंधक व संस्थेस द्यावा. तपासणी अधिकाऱ्याने तथा तपासणी पथक प्रमूखाने तपासणी अहवालाची शकपूर्तता संस्थेकडून १५ दिवसांचे आत मागवून घेवून त्यावर दुरूस्ती शेरे, अभिप्राय नोंदवून तसा दोष निराकरण अहवाल संबंधित निबंधकाकडे सादर करावा. शकपूर्तता अहवाल मागविण्याची जबाबदारी संबंधित तपासणी अधिकाऱ्याची व तपासणी प्रमुखाची राहील.

५. तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित निबंधकाने त्यातील गंभीर दोष व मुद्दे यावर संस्थेचा दोष पूर्तता अहवाल १ महिन्याचे आत संबंधित तपासणी अधिकाऱ्याचे शेरे व अभिप्रायासह मागवून कायद्यातील तरतूदीप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही १ महिन्याचे आत करावी.

६. या परिपत्रकास अनुसरून तपासणी कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर संस्थांची तपासणी घेणे आवश्यक आहे, असे संबंधित निबंधकास वाटल्यास त्या संस्थांची तपासणी निबंधक घेवू शकतील. तसेच तक्रार प्राप्त संस्थांची तपासणी देखील तपासणी कार्यक्रमाशिवाय संबंधित निबंधकास वेळोवेळी करता येईल.

७. तपासणी कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांची तपासणी त्या वर्षामध्ये कोणत्या क्रमाने व कधी करावयाची याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित तपासणी अधिकाऱ्यास किंवा तपासणी पथक प्रमूखास राहील.

८. सदरच्या तपासण्या करतांना संस्थांच्या विश्वसार्हतेस बाधा पोहचेल अशी जाहीर विधाने करण्यात येवू नये. शिवाय या वित्तीय संस्थांच्या तपासणी आदेशास व अहवालास प्रसिध्दी मिळणार नाही याची खबरदारी घ्यावी.

९. सदरहू परिपत्रकीय निर्देशा अन्वये होणा-या तपासण्याअंती तपासणी अधिकारी तथा तपासणी पथक प्रमुख अथवा पथक सदस्य यांचेविषयी गैरवर्तन अथवा गैरप्रकार याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या व त्यामध्ये चौकशी अंती तथ्य आढळून आल्यास संबंधितावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल आणि त्यांची तपासणी कामी पुन:श्च नेमणूक केली जाणार नाही.

१०. सोबतचे **परिशिष्ट अ** प्रमाणे कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी कामकाजाची नोंदवही संबंधित निबंधकाने आपल्या कार्यालयस्तरावर ठेवावी. सदरहू नोंदवही वार्षिक लक्षांकाप्रमाणे तपासणी अधिकारीनिहाय ठेवावी. निर्धारित करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये नियमीत नोंदी घेणेसाठी एका कर्मचाऱ्याची नेमणूक करावी.

११. सोबतचे **परिशिष्ट ब** प्रमाणे मासीक संस्था तपासणी अहवाल तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधक व तालुका लेखापरीक्षक यांनी एकत्रीतपणे तयार करून जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना **दरमहा ५ तारखेपर्यंत** सादर करावा. जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी सदरहू मासीक अहवालाचे संकलन करून त्यांचे जिल्ह्याचा एकत्रीत मासीक अहवाल संबंधित विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण) यांना **दरमहा ७ तारखेपर्यंत** सादर करावा. विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण) यांनी त्यांचा मासीक अहवाल एकत्रीतपणे संकलीत करून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **दरमहा १० तारखेपर्यंत** सादर करावा.

राज्यातील सहकारी संस्थांचा कलम ८९ अ प्रमाणे वार्षिक तपासणी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे काटेकोरपणे करण्यात यावी. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करावयाची असून सन २०१५-१६ या वर्षाचा १ ऑगस्ट २०१५ पासूनचा वार्षिक कृती आराखडा १५ जुलै २०१५ पूर्वी अंतिम रित्या तयार करण्यात यावा. त्यानंतर सर्व नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण २५ जुलै २०१५ पूर्वी घेण्यात यावे आणि ऑगस्ट २०१५ पासून संबंधितांना दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे त्यांनी कलम ८९ अ प्रमाणे तपासणी करण्याची कार्यवाही करावी.

चंना.दळवी

( **चंद्रकांत दळवी** )
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव -:**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.
६. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
८. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
१०. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
११. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१६. अपर निबंधक (आदिवासी विकास), सहकारी संस्था, नाशिक.
१७. मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१. मा.प्रधान सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .
२. मा. प्रधान सचिव (पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .
३. मा. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .

**प्रत माहितीस्तव सस्नेह सादर:**

१. मा. मंत्री (सहकार,पणन) यांचे खाजगी सचिव
२. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव

## सहकारी संस्थांची कलम ८९ अ अन्वये निबंधक व खात्यातील लेखापरीक्षक यांनी तपासणी करणेबाबतच्या सहकार आयुक्त कार्यालयाकडील परिपत्रक क्र ११६ दिनांक २५/०६/२०१५ सोबतची परिशिष्टे

परिशिष्ट- अ

### कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी कामकाजाची निबंधक यांनी ठेवावयाची नोंदवही

विभाग/जिल्हा/तालुका/वॉर्ड : महिनाः

| अ क्र | संस्थेचे नाव | कार्य क्षेत्र | संस्था मुख्याल याचा जिल्हा | तपास णी अधिका -याचे नाव व पदनाम | तपासणी आदेश दिनांक | तपासणी पुर्ण दिनांक | तपासणी अहवाल संस्था व निबंधकास सादर केल्याचा दिनांक | शक पूर्तता अहवाल तपासणी अधिका न्यास प्राप्त दिनांक | शक पूर्तता अहवाल निबंधका स सादर दिनांक | शक पूर्तता अहवालावर निबंधकाने केलेली पुढील कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

परिशिष्ट- ब

### कलम ८९ अ अंतर्गत संस्था तपासणी लक्षांक व परिपूर्ती मासीक अहवाल

विभाग/जिल्हा/तालुका/वॉर्ड : महिनाः

| अ क्र | विभाग/ जिल्हा/ तालुका/ वॉर्ड | तपासणी अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | तपासणी संस्था संख्या लक्षांक (वार्षिक) | तपासणी संस्था संख्या लक्षांक (मासिक) | चालू महिन्यामध्ये तपासणी पुर्ण केलेल्या संस्थांची संख्या | चालू महिना अखेर **एकूण** तपासणी पूर्ण केलेल्या संस्थांची संख्या | चालू महिन्यामध्ये उद्दिष्टापेक्षा कमी अथवा जास्त तपासणी पूर्ण केलेल्या संस्थांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |